# लोकसभेला 'कमळ'कोमेजल्यानं आमदारांची वाढली चिंता

- दोघा लोकप्रतिनिधींवर उमदेवारी न मिळण्याची टांगती तलवार
- निवडणूक निकालाचे भाजपमध्ये उमटताहेत पडसाद

✔ सोलापूर/प्रतिनिधी

**सोलापूर लोकसभा निवडणुकीत काँग्रेसच्या प्रणिती शिंदे यांनी तब्बल ७४ हजारांनी विजय मिळवत भाजपला जोरदार धक्का दिला. आ. प्रणिती शिंदेंना भाजप आमदारांच्या मतदार संघातून जबरदस्त लीड मिळाले आहे. दक्षिण सोलापूरचे भाजप आ. सुभाष देशमुख, पंढरपूर मंगळवेढाचे भाजप आमदार समाधान अवताडे यांच्या विधानसभा मतदारसंघातून काँग्रेसने मुसंडी मारत राम सातपुते यांच्या विरोधात लीड घेतला. या पराभवाचे आता दूरगामी परिणाम या आमदारांवर होणार आहे. विधानसभेला या आमदारांची उमेदवारी डेंजर झोनमध्ये गेली आहे. या निकालाने अनेक आमदारांच्या विधानसभेच्या तिकीटावर टांगती तलवार आल्याचे मानले जात आहे.**

आ.प्रणिती शिंदे आणि आ. राम सातपुते यांच्यात सोलापूर लोकसभेसाठी झालेली लढत रंगतदार होईल असे वाटत होते. मात्र मतमोजणी दरम्यान ही लढत आ. शिंदे यांच्याबाजूने एकतर्फी गेल्याचे दिसून आले. भाजपला शहर उत्तर आणि अक्कलकोट, दक्षिण विधानसभा मतदारसंघाबाबत मोठी अपेक्षा होती. २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत शहर उत्तर आणि अक्कलकोट मतदार संघाने भाजपला मोठे मताधिक्य दिले होते. दक्षिणमध्ये गतवेळेही चांगले मताधिक्य मिळाले होते.

२०१९ च्या निवडणुकीचा अभ्यास केला तर शहर उत्तर मध्ये डॉ. जयसिद्धेश्वर महाराज यांना सुमारे ६७ हजार, अक्कलकोट मतदारसंघातून ३६ हजार तर दक्षिणमधून ३७ हजारांचे मताधिक्य मिळाले होते. यंदा जातीय समिकरण आणि इतर फॅक्टर वगळता शहर उत्तरमधून किमान पन्नास हजार, अक्कलकोट मतदारसंघातून २५ हजार तर दक्षिण मतदारसंघात बरोबरी होईल असे पक्षाला वाटत होते. मात्र सर्व चित्र उलटे झाले. निवडणुकीपूर्वी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्येक आमदरांना त्यांच्या मतदारसंघातून मताधिक्य देण्याचे आदेशच काढले होते.



मताधिक्य नसेल तर त्यांना विधानसभेला उमेदवारी देताना विचार करावा लागेल असा इशाराही दिला होता. सोलापुरात प्रचारादम्यान आल्यावर त्यांनी सर्वांना समोर बसवत ठणकावले होते. आता उपमुख्यमंत्री फडणवीस आणि पक्ष सोलापुरातील आमदारांबाबत काय विचार करणार याकडे लक्ष लागले आहेत. निकालानंतरचे परिणाम पाहता चार पैकी दोन आमदार तर उमेदवारांची डोकेदुखी वाढणार हे नक्की.

### आमदार कल्याणेशट्टींची आता लागणार कसोटी



भाजपचे जिल्हाध्यक्ष व आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या मतदार संघातून अपेक्षाभंग झाला आहे. अक्कलकोटमधून फक्त ९ हजार २९७ मताधिक्य सातपुते यांना मिळाले आहे. त्यामुळे गेल्यावेळी एकतर्फी निवडून आलेल्या सचिन कल्याणशेट्टी यांची यंदा कसोटी लागण्याची शक्यता आहे. आ.कल्याणशेट्टी यांना उमेदवारी मिळेल असे वाटत असले तरी पुढील काळ त्यांच्यासाठी खडतर असणार आहे.

### परिचारक, राजन पाटलांना आत्मचिंतनाची गरज






पंढरपूर मतदारसंघ सोलापूर आणि माढा या दोन मतदारसंघात विभागला आहे. येथून दोन्ही मतदारसंघात मताधिक्य देण्यात परिचारक यांना अपयश आले आहे. दोन्ही उमेदवारांनी येथून मोठे मताधिक्य मिळवले आहे. दुसरीकडे मोहोळमध्ये एकहाती वर्चस्व असलेले आणि सातपुते यांना सर्वाधिक मताधिक्य देण्याची वल्गना केलेले माजी आ. राजन पाटील सपशेल अपयशी ठरले आहेत. या दोघांनीही आता चिंतन करण्याची गरज आहे.

### आ. विजयकुमार देशमुख मात्र सेफ



आमदार विजयकुमार देशमुख यांच्या शहर उत्तर मतदारसंघातून भाजपाने सलग तिसऱ्या लोकसभा निवडणुकीत मोठे मताधिक्य मिळाले आहे. त्यांनी पक्षनेतृत्वाला उत्तरमधून ४० हजारांचे तर शहर मध्यमधून भाजप फार मागे राहणार नाही असे सांगितले होते. त्याप्रमाणे शहर उत्तरमधून ३७ हजारांपेक्षा जास्त मताधिक्य मिळाले आहे तर शहर मध्यमध्येही भाजपाने चांगली कामगिरी केली आहे. त्यामुळे देशमुख विधानसभेसाठी सेफ झाल्याची चर्चा आहे.

### आमदार सुभाष देशमुख यांची डोकेदुखी वाढली



सोलापूर दक्षिण मतदारसंघातून प्रत्येक खासदारकीच्या निवडणुकीत भाजपला किमान २५ हजार पेक्षा जास्त मताधिक्य मिळत होते. यंदाच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला ९ हजार ४३६ मताधिक्य मिळाली आहे. ग्रामीण भागात तर भाजपला मोठ्या अडचणीचा सामना करावा लागला. शहरी भागातील मतदारांनी भाजपला तारले अन्यथा या भागातूनही भाजप २० ते २५ हजारांच्या फरकाने मागे पडला असता. ही आकडेवारी पाहता विद्यमान आमदार सुभाष देशमुख यांच्यासाठी डोकेदुखी ठरणारी आहे.

### आमदार आवताडे डेंजर झोनमध्ये



पोट निवडणुकीत पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातून निवडुन आलेले भाजपचे आमदार समाधान आवताडे डेंजर झोनमध्ये गेले आहेत. पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघात काँग्रेसला ४६ हजारांचे मताधिक्य मिळाले आहे. ही आकडेवारी भाजप आमदार समाधान आवताडे यांच्यासाठी भविष्यात डेंजर झोनमध्ये नेणारी ठरली आहे.

## प्रणिती शिंदे यांच्या विजयात कोगनुरेंचा मोठा वाटा

✔ दक्षिण सोलापूर/प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीत प्रणिती शिंदे यांनी मोठा विजय मिळवत भाजपला हॅट्ट्रिकपासून रोखले. दक्षिण सोलापूरमधून काँग्रेसला सुमारे १० हजारांचे मताधिक्य मिळाले. यामध्ये एम के फाउंडेशन चे संस्थापक महादेव कोगनुरे यांचा महत्वाचा वाटा आहे.

सोलापूर लोकसभा निवडणूक प्रचाराला जेव्हा सुरुवात झाली. तेव्हापासून महायुतीकडून आमदार रामभाऊ सातपुते आणि महाविकास आघाडीकडून माजी केंद्रीयमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी एम के फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष महादेव कोगनुरे यांचे समर्थन मिळवण्यासाठी प्रयत्न केला होता. कोगनुरे यांनी महाविकास आघाडीला पाठिंबा दिला. काँग्रेसमध्ये प्रवेश करत शिंदे यांचा प्रचार करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी कार्यकर्त्यांसमवेत प्रभावी प्रचार यंत्रणा राबवत दक्षिण सोलापूर मतदार संघ पिंजून काढला होता. प्रणिती शिंदे विजयी होताच महादेव कोगनुरे यांना जेव्हा दोन्ही पक्षाकडून दबाव येत असताना ही महाविकास आघाडी बरोबर जाण्याचा निर्णय घेतला होता.आज कोगनुरे त्यांनी घेतलेल्या याच निर्णयाचे सर्वत्र जोरदार स्वागत होताना पाहायला मिळत आहे. कारण मह कोगनुरे यापूर्वी ही माजी खासदार डॉ.जयसिध्देश्वर शिवाचार्य महाराज यांच्यासमवेत राहून भाजप पक्ष वाढवण्यासाठी परिश्रम घेतले होते.यंदा लोकसभा निवडणुकीत महादेव कोगनुरे यांनी केलेला पहिला प्रयोग शंभर टक्के यशस्वी झाल्याचे बोलले जात. त्यामुळे महाविकास आघाडीत महादेव कोगनुरे यांचे नक्कीच वजन वाढल्याचे बोलले जात आहे. भविष्यात महादेव कोगनुरे यांना महाविकास आघाडीकडून भविष्यातील मोठी जबाबदारी मिळणार असल्याची चर्चा आहे.



सोलापूर : प्रणिती शिंदे या खासदारपदी निवडून आल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करताना एम.के. फॉउंडेशनचे महादेव कोगनुरे. यावेळी सुशीलकुमार शिंदे, चेतन नरोटे आदी.

## देवेंद्र कोठेंनी मानले सोलापूरमधील मतदारांचे आभार

✔ सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर लोकसभा निवडणुकीत प्रणिती शिंदे यांनी राम सातपुते यांचा पराभव केला. या निवडणुकीत आ. सातपुते यांना शहर उत्तर आणि शहर मध्य मध्ये चांगले मतदान झाले. त्यामुळे माजी नगरसेवक देवेंद्र कोठे यांनी दोन्ही मतदारसंघासह संपूर्ण मतदारसंघातील जनतेचे आभार मानले आहेत.

भारतीय जनता पार्टी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर विश्वास ठेवून सातपुते यांना मतदान केलेल्या समस्त सोलापूर लोकसभा मतदारसंघातील मतदारांचे आभार. देशात तिसऱ्यांदा मोदी सरकार स्थापन होत असताना सोलापुरात झालेला पक्षाचा पराभव हा गड आला पण सिंह गेला असेच आहे . लोकशाहीत आलेला कौल स्वीकारून पुन्हा नव्या उमेदाने कार्यरत राहू. अल्प वेळेत सातपुते यांनी संपूर्ण सोलापूर लोकसभा पिंजून काढला. त्यांना महायुती पक्षातील पदाधिकाऱ्यांनीही मदत केली, त्यांचेही आभार.

शहर मध्य मतदार संघातील ८९ हजार ६७२ मतदार भाजपच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहिले. २०१९ निवडणूक शहर मध्य विधानसभेत ८१ हजार २९८ मतदान मिळाले होते. यंदा अटीतटीच्या लढतीत ही शहर मध्ये निर्णयाक वाढ मिळाली.प्रभाग सात व शहर उत्तर विधानसभेतीलही चांगले मतदान मिळाले. सहाकार्य केलेल्या मतदारांचे ही सहकार्य लाभले त्यांचेही मनस्वी आभार, असे कोठे यांनी म्हटले आहे.



## मराठा, धनगर, मुस्लिम समाजानी प्रणिती शिंदेंचा केला हात बळकट

### शहर 'उत्तर'मध्ये ताईला १७ हजारांचे मताधिक्य, तालुक्याच्या राजकारणावर परिणाम

✔ उत्तर सोलापूर/प्रतिनिधी

उत्तर सोलापूर तालुका तीन विधसभा म तदार संघात विभागाला आहे.युतीचे उमेदवार राम सातपुतेना मराठा,धनगर व मुस्लिम समाजानी नाकारल असल्याचे दिसून येत आहे.प्रणिती शिंर्देना उत्तर मधून १७ हजाराचे लीड देत काँग्रेसवर पुनः हक्क दाखविला असल्याचे बोलले जात आहे.

उत्तर मधील सर्वात मोहोळ मतदारसंघ मोठा असून २४ गावे आहेत. अजित पवार गटाचे आमदार यशवंत माने,शरद पवार गटाचे बळीराम साठे,भाजप कार्यकारणी सदस्य शहाजी पवार,इंद्रजित पवार यांच्यासह माजी आमदार दिलीप माने यांचे देखील वर्चस्व आहे.कार्यकर्ते मोठ्या प्रमाणत आहेत. उत्तर मधील तीन विधानसभा मतदार संघात प्रणिती शिंदेना १७००० मताचा लीड दिला असून प्रश्न नक्कीच मार्गी लागतील असा विश्वास केला आहे.

मोहोळ मतदार संघातील २४ गावातून शिंदेंना २४२१७ व राम सातापूते ना ११९०७ मते पडली असून १३१०७ मताची आघाडी दिली आहे.दक्षिण मतदार संघातील १० गावातून शिंदेना३३३४ मताचा लीड दक्षिण मधून मिळाला.दक्षिणचे विद्यमान आमदार सुभाष देशमुख यांचे वर्चस्व असून शिंदेंना ३३३४ मताची आघाडी मिळाली .शहर उत्तर मधील कोंडी व खेड येत असून विद्यमान आमदार विजयकुमार देशमुख यांचा बोलबाला आहेत या दोन्ही गावातुन ३२९ मताचा लीड मिळालास आहे.तिन्ही मतदार संघातुन प्रणिती शिंदेंना १७ हजार हुन अधिक मताचा लीड देऊन विजयी करण्यात उपजिल्हा अध्यक्ष भारत जाधव, उत्तर तालुका अध्यक्ष शालीवाहन माने,सचिन गुंड,संजय पोळ, संदिप सुरवसे,प्रल्हाद काशीद,संजय खरटमल, सागर राठोड यांच्यसह अनेक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## राम सातपुतेंकडून प्रणिती शिंदेंना शुभेच्छा सोलापूरवासियांचेही मानले आभार; दिला संदेश

✔ सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर लोकसभा मतदारसंघात झालेल्या चुरशीच्या लढतीत काँग्रेसच्या आमदार प्रणिती शिंदे या राम सातपुते यांचा पराभव करत विजयी झाल्या. या विजयानंतर आ.सातपुते यांनी खा. प्रणिती शिंदे यांना शुभेच्छा दिल्या आहेत. मात्र त्यांनी शिंदे यांच्या नावाचा उल्लेख टाळला आहे.

आ. सातपुते यांनी सोशल मिडीयावर एक पत्र व्हायरल करत सोलापूरकरांचेही आभार मानले आहेत. भाजप आणि एनडीए यांच्या कामांवर विश्वास दाखवत मला मत देणाऱ्या सोलापूरमधील ५ लाख ४६ हजार मतदार बंधू-भगिनींचे मी मनापासून आभार मानतो.

सोलापूरकरांनी माझ्यावर दाखवलेला हा विश्वास खरोखर भारावून टाकणारा आहे. अतिशय अल्पावधीत सोलापूरकरांनी दिलेलं हे उदंड प्रेम माझ्यासाठी नक्कीच खूप महत्त्वाचे आहे. या निवडणुकीत माझ्यासाठी अतिशय मेहनत घेऊन काम केलेल्या महायुतीमधील सर्व नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचे मनापासून आभार मानतो. तसेच सर्वसामान्य कुटुंबातून आलेल्या माझ्यासारख्या कार्यकर्त्याच्या कामावर विश्वास ठेवत मला सोलापूर लोकसभेची उमेदवारी दिली, त्याबद्दल मी भारतीय जनता पार्टीच्या वरिष्ठ नेतृत्वाचा देखील मनापासून आभारी आहे. सोलापूरकरांशी असलेले माझे हे ऋणानुबंध असेच कायम राहतील. सोलापूर जिल्ह्याचे प्रश्न सोडविण्यासाठी नेहमीच कटिबद्ध आहे असे पत्रात म्हटले आहे.

# अक्कलकोट तालुक्यात लोकसभा निवडणुकीला फिरसे 'कमल' खिले





### भाजपचे मताधिक्य कायम; ९,२९७ मतांची आघाडी, आ. कल्याणशेट्टी यांनी लढवला किल्ला

✔ अक्कलकोट/रविकांत धनशेट्टी

**सोलापूर लोकसभा निवडणुकीत काँग्रेसच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांनी तब्बल ७४ हजार १९७ मतांची आघाडी मिळवित विजय मिळविला. काँग्रेसचे उमेदवार प्रणिती शिंदे यांना एकूण ६ लाख २० हजार २२५ मते मिळाली तर भाजपाचे उमेदवार राम सातपुते यांना ५ लाख ४६ हजार २८ मते मिळाली. भाजपाचे जिल्हाध्यक्ष तथा आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी अक्कलकोट विधानसभा मतदार संघात तब्बल ९ हजार २९७ मतांची आघाडी मिळवित तालुक्यावर आपली पकड असल्याचे परत सिद्ध केले.**

अक्कलकोट विधानसभा मतदार संघात काँग्रेसच्या प्रणिती शिंदे यांना ९७ हजार ९५४ तर भाजपाच्या राम सातपुते यांना १ लाख ७ हजार २५१ मते मिळाली.आ. कल्याणशेट्टी यांनी एकहाती किल्ला लढवत आपल्या अक्कलकोट मतदारसंघातील लीड तर कायम ठेवलीच त्याचबरोबर संपूर्ण लोकसभा मतदार संघात भाजपाला लीड मिळविण्यासाठी नियोजन केले. लोकसभेची जरी निवडणूक असली तरी कल्याणशेट्टी व माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांची विधानसभेची रंगीत तालीम होती. त्यात कल्याणशेट्टींनी बाजी मारत सुमारे दहा हजारांचे मताधिक्य मिळवले.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील अक्कलकोट विधानसभा मतदार संघातील बोरामणी, कुंभारी, मुस्ती, उळे, धोत्री, वळसंग, आचेगांव, मुळेगांव, कासेगांव आदीसह या ३५ गावात भाजपाला २८ हजार ४१८ मते मिळाली तर काँग्रेसला २५ हजार ६६९ मते मिळाली. या भागातुन भाजपाला २हजार ७४९ मतांची आघाडी मिळाली.

मैंदर्गीत भाजपाला २१५ मतांची आघाडी मिळाली. मैंदर्गीत भाजपाला ३२४२ तर काँग्रेसला ३०२७ मते मिळाली. अक्कलकोट शहरात भाजपाला १०४७ मतांची आघाडी मिळाली. भाजपाला ११५९७ तर काँग्रेसला १०५५० मते मिळाली.

काँग्रेसचे जि.प. सदस्य मल्लिकार्जुन पाटील यांच्या जेऊर गावात भाजपाला २०१ मतांची आघाडी मिळाली. भाजपाला २१६४ तर काँग्रेसला १९६३ मते मिळाली.

चुंगीत काँग्रेस ४६२ मताची आघाडी मिळाली तर किणीत भाजपाला १० मताची आघाडी मिळाली. चप्पळगांवात काँग्रेसला २७९ मतांची आघाडी मिळाली. भाजपाला १०४३ तर काँग्रेसला १३२२ मते मिळाली.हालहळ्ळी अ गावात भाजपाला १६८ मताची आघाडी मिळाली.भाजपाला ३३४ तर काँग्रेसला १६६ मते मिळाली.

कुरनुर गावात काँग्रेसला २६० मताची आघाडी मिळाली. भाजपाला ९७६ तर काँग्रेसला १२३६ मते मिळाली.

कर्जाळ गावात काँग्रेस २१० मताची आघाडी मिळाली तर कोन्हाळीत भाजपाला ६३ मतांची आघाडी मिळाली. हंजगी गावात काँग्रेसला ११५ मताची आघाडी मिळाली. बादोले बु येथे काँग्रेस १२३ मताची आघाडी मिळाली. तडवळ गावात भाजपाला ६८० मतांची आघाडी मिळाली. भाजपाला १३८६ तर काँग्रेसला ७०६ मते मिळाली. मुंढेवाडीत काँग्रेसला २७४ मते मिळाली तर भाजपाला त्याच्या दुप्पट ५४८ मते मिळाली. कोर्से गांव गावात भाजपाला ११९ मताची आघाडी मिळाली.कल्लकर्जाळ भाजपाला २३६ मताची आघाडी मिळाली. तसेच शेगांव गावात भाजपाला २९२ मताची आघाडी मिळाली.शावळमध्ये काँग्रेसला १०५ मताची आघाडी मिळाली. नागनहळ्ळी गावात काँग्रेसला ३१६ मतांची आघाडी मिळाली. शिरवळ गावात भाजपाला २५४ मताची आघाडी मिळाली. तर वागदरी गावात भाजपाला अपेक्षेप्रमाणे ५०४ मताची आघाडी मिळाली. तर सलगर गावात भाजपाला ६११ मताची आघाडी मिळाली. नागणसुर गावात भाजपाला तब्बल ११३२ मतांची आघाडी मिळाली. भाजपाला २५९८ तर काँग्रेसला १४६६ मते मिळाली. हैद्रा गावात अवघ्या ११ मताच्या मताधिक्यावर भाजपाला समाधान मानावे लागले. तोळणूर गावात भाजपाला ५६९ मताची आघाडी मिळाली. नुकत्याच भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केलेल्या माजी सभापती महेश जानकर यांच्या कलप्पावाडी गावात काँग्रेसला १९५ मताची आघाडी मिळाली. उमरगे गावात भाजपाला १५५ मताची आघाडी मिळाली.तर नुकताच भाजपामध्ये प्रवेश केलेल्या माजी उपसभापती विलास गव्हाणे यांच्या दोड्याळ गावात भाजपाला २६६ मताची आघाडी मिळाली. दुधनी गांधीनगर तांडा येथे भाजपाला २० मताची आघाडी मिळाली.

### नेते मंडळींच्या गावात मिळालेले मताधिक्य

आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या मुळ गाव हन्नुर मध्ये भाजपाला १३६ मतांची आघाडी मिळाली. भाजपाला १०५१ तर काँग्रेसला ९१५ मते मिळाली. माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे याच्या दुधनीत काँग्रेसला ५०४ मतांची आघाडी मिळाली. दुधनीत २१४७ भाजपाला तर काँग्रेसला २६५१ मते मिळाली. माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांच्या कुमठे गावात भाजपाला २११ मतांची आघाडी मिळाली. भाजपाला ३१७ तर काँग्रेसला १०६ मते मिळाली. नुकतेच भाजपात प्रवेश केलेल्या दत्ता शिंदे यांच्या गावात काँग्रेसला ७५ मतांची आघाडी मिळाली. भाजपाला ५८६ तर काँग्रेसला ६६१ मते मिळाली. माजी खा. जयसिद्धेश्वर महास्वामी यांच्यात गौडगांव बु गावात भाजपाला ३३४ मतांची आघाडी मिळाली.